'डेक्सामेथासोन'च्या अधिक मात्रेचा प्रभाव कमी

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : करोनाची साथ वेगाने पसरत असताना 'डेक्सामेथासोन' हे स्वस्तात मिळणारे औषध जीव वाचवणारे ठरणारे आहे, असा दावा करण्यात येत होता. मात्र, या औषधाची मोठी मात्रा युरोपमधील रुग्णांप्रमाणे भारतात प्रभावी ठरली नाही, असे 'लॅन्सेट रिजनल हेल्थ - साऊथ ईस्ट एशिया जर्नल'मध्ये प्रकाशित संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या संशोधनात कोपनहेगन विद्यापीठ रुग्णालय - रिगशॉस्पिटालेट, डेन्मार्कचे तज्ज्ञ सहभागी झाले होते. त्यांच्या माहितीनुसार भारतातील रुग्णांवर १२ मिलिग्रॅम 'डेक्सामेथासोन'ची मोठी मात्रा उपयुक्त ठरली नाही. हे निष्कर्ष रुग्ण वाचण्याचा दर, ९० आणि १८० दिवसांनंतर रुग्णांचे आरोग्य कसे होते, या आधारे काढण्यात आले आहेत.

संशोधकांच्या म्हणण्यानुसार 'डेक्सामेथासोन'च्या मोठ्या मात्रेमुळे भारतातील रुग्णांना फारसा त्रास झाला नाही, हेसुद्धा महत्त्वाचे आहे. मात्र, हे आमचे प्राथमिक निष्कर्ष आहेत. त्यामुळे याबाबत आणखी विश्लेषणाची आवश्यकता आहे.

संशोधनात पथकात अपोलो रुग्णालय-चेन्नई, होमी भाभा राष्ट्रीय संस्था, जॉर्ज इन्स्टिट्यूट फॉर ग्लोबल हेल्थ- दिल्ली आणि ऑस्ट्रेलियातील तज्ज्ञ सहभागी झाले होते.

बेस्ट टॉनिक तुमच्या फॅमिली मेम्बर्ससाठी
तुम्हाला जळजळ, थकवा जाणवतो का?
केस गळतायत? डोकेदुखी जाणवते का?
पायदुखी ? झोप शांत लागत नाही का?
कामात उत्साह नाही का?
रोज घ्या बेस्ट टॉनिक २ तन्वीशता टॅबलेट्स
तन्वी ठाणे क्लिनिक 9769695892

तन्वी हर्बल क्लिनिक फ्रि हेल्थ चेकअप कॅम्प » रवि. 3 डिसेंबर रोजी
चिपळूण 9970078158 | विक्रोळी 8928777745 | लातूर 9850944658

दीपावली सुटीत नगर विभागाला विक्रमी २३ कोटी ५३ लाखांचे उत्पन्न

'लाल परी'ला प्रवाशांकडून भरभरून प्रतिसाद

मोहनीराज लहाडे लोकसत्ता

नगर : एसटी महामंडळाच्या नगर विभागाला दीपावली सुटी काळात प्रवाशांकडून भरभरून दान मिळाले आहे. दीपावली सुटीच्या १९ दिवसांच्या कालावधीत नगर विभागाला तब्बल २३ कोटी ५३ लाख १९ हजार रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले आहे. हे उत्पन्न प्रति किमी. ५६ रुपये ठरले आहे. प्रवाशांना विविध प्रकारच्या सवलती दिल्यानंतरही विक्रमी उत्पन्न मिळाले आहे. दि. ९ ते २७ नोव्हेंबर या कालावधीतील हे उत्पन्न आहे.

दीपावली सण व त्यानिमित्ताने मिळणाऱ्या सुट्या याचा फायदा मोठ्या संख्येने प्रवाशांनी एसटी बसमधून प्रवासाचा लाभ घेतला. प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. त्यानुसार यंदा १० टक्के भाडेवाढ करण्यात आली होती. एसटी महामंडळाला खासगी प्रवासी वाहतुकीचे मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलत महामंडळाच्या नगर विभागाने विक्रमी उत्पन्न मिळवले आहे.



सवलत देऊनही उत्पन्नवाढ

उत्पन्न वाढीमध्ये एसटी महामंडळ महिला प्रवाशांना ५० टक्के सवलत देते. त्याचा मोठा हातभार लागला आहे. याशिवाय अमृत जेष्ठ नागरिकांसाठी (७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास), ज्येष्ठ नागरिकांसाठी (६५ ते ७५ वयोगट) ५० टक्के सवलत योजना आहे. या योजनाही सर्व प्रकारच्या एसटी बसला लागू आहेत. हंगामी दरवाढ केल्यानंतरही त्याचा मोठा फायदा घेतला गेला.

या २३ कोटी ५३ लाखांमध्ये रोख स्वरुपाचे उत्पन्न १४ कोटी ४ लाख ५० हजार रुपयांचे आहे तर विविध स्वरुपांच्या सवलती घेणाऱ्या प्रवाशांकडून ४२ कोटी १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. महामंडळ प्रवाशांना ज्या विविध सवलतींचा लाभ देते त्याची भरपाई नंतर राज्य सरकारकडून केली जाते.

नगर जिल्ह्यात महामंडळ सरासरी १ लाख ३० हजार ते १ लाख ४० हजार प्रवाशांची वाहतूक प्रतिदिन करते. मात्र दीपावलीच्या काळात तब्बल ४१ लाख ९१ हजार प्रवाशांनी एसटी बसचा लाभ घेतला. हे भारमान सरासरी ८१.६१ आहे. इतर सर्वसामान्य दिवशी महामंडळाला प्रति किमी सुमारे ३० रुपयांचे उत्पन्न मिळते. महामंडळाच्या बसेस रोज सरासरी २ लाख १० हजार किमी धावतात. परंतु, दीपावलीच्या काळात ५६ रुपये प्रति किमी उत्पन्न मिळाले.

प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने फेऱ्या वाढवण्याचे नियोजन केले होते. एकूण ६२५ एसटी बस रोज फेऱ्या करत होत्या. सुटीमुळे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसफेऱ्या बंद होत्या, त्या वळवण्यात आल्या. लांब पल्ल्याच्या ५० बस वाढवल्या गेल्या होत्या.

> दीपावलीच्या सुटी काळात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन जास्त गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्याला प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिला. प्रवासी संख्येत वाढ होण्याबरोबरच उत्पन्नातही वाढ झाली आहे. सर्व आगाराच्या प्रमुखांनी या कालावधीमध्ये अतिरिक्त काम केले. त्यादृष्टीने सर्वांनी मिळून केलेले नियोजन यशस्वी ठरले. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात २५ टक्के वाढ झाली आहे.
>
> **- मुकुंद नगराळे,** प्रभारी विभाग नियंत्रक, नगर

BHAURAO CHAVAN SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.
Unit No.1, Laxminagar, Degaon-Yelegaon, Tq.Ardhapur, Dist.Nanded
E-Mail : bcssk.purchase@rediffmail.com & Website : www.bhauraosugar.com

TENDER NOTICE

Sealed Tenders in prescribed forms are invited from the reputed Manufacturer/ Supplier for the following equipments.

Sr. No.	Description	Tender Document Fees Rs.	Sale of Tender Document
1	Upgradation of Raw Water Treatment Plant	1000.00	30.11.2023 to 06.12.2023
2	Upgradation of Softening Plant	1000.00	
3	Civil work for Water Treatment Plant upgradation	1000.00	

1. Tender Document Fees to be paid Online.
The Management reserves the right to accept/reject any or all tenders without assigning any reason.

Managing Director Vice-Chairman Chairman

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासनिक भवन, चेंबूर, मुंबई ४०० ०७४, महाराष्ट्र, भारत
फोन: ०० ९१ २२ २५५२ २२४२ / २५५२ २७५३/ २५५२ २६०८
फॅक्स: ०० ९१ २२ २५५२ २३२० • CIN: L24110MH1978GOI020185

विक्रेत्यांची वैश्विक पूर्व-पात्रता

उत्पाद	संदर्भ सं. :
म्यूरेट ऑफ पोटाश	डीसी/एमआर/पीक्यूएन/एमओपी:२१६५०

मोठ्या प्रमाणात म्यूरेट ऑफ पोटाश (भारतीय एफसीओ प्रमाणे) च्या पुरवठ्यासाठी विक्रेत्यांच्या पूर्व-पात्रतेसाठी निर्माते/व्यवसायी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

बंद होण्याची तारीख आणि वेळ: **२८ डिसेंबर, २०२३ रोजी १७.०० वा. पर्यंत आयएसटी**

पूर्व-पात्रतेसाठी सम्पूर्ण तपशील आरसीएफ संकेतस्थळ: **www.rcfltd.com** वर टॉम्बे निविदा अंतर्गत उपलब्ध आहेत.

दस्तावेज जमा करण्यासाठी संकेतस्थळ: **https://eprocure.gov.in/eprocure/app**

सीपीपी निविदा आयडी : **२०२३_आरसीएफएल_७८२४२४_१** — उप महाव्यवस्थापक (सामग्री)

समृद्धिची एकत्र वाटचाल

कृषी विद्यापीठाच्या कारभारासंदर्भात विधिमंडळात प्रश्न उपस्थित करणार

आमदार प्राजक्त तनपुरे यांच्याकडून प्रशासनाची झाडाझडती

लोकसत्ता प्रतिनिधी

नगर : राहुरीतील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अनागोंदी कारभाराबद्दल विशेषतः बांधकाम विभागातील तक्रारींबद्दल विधिमंडळाच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आज, बुधवारी सांगितले. आमदार तनपुरे यांनी विद्यापीठ प्रशासनाची झाडझडती घेतली. कृषी विद्यापीठाचा कारभार व तेथे गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी माजी राज्यमंत्री तथा आमदार तनपुरे यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार त्यांनी आज विद्यापीठात जाऊन विद्यापीठाचे अधिकारी व तक्रारदारांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत बरीच खडाजंगी उडाली. विशेषतः विद्यापीठाच्या बांधकाम विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारात संदर्भात तक्रारी करण्यात आल्या. त्याचा समाधानकारक खुलासा न झाल्याने व तक्रारदारांनी नियमबाह्य कारभार चव्हाट्यावर आणल्याने आमदार तनपुरे यांनी अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.

गेली १५ ते २० वर्षांपासून काम करणाऱ्या तरुण अभियत्यांना कोणतेही कारण न देता कामावरून काढून टाकण्यात आले. या अन्यायाकडेही त्यांचे लक्ष वेधण्यात आले. त्याचाही जाब आमदार तनपुरे यांनी विचारला. मात्र विद्यापीठाच्या प्रशासनाला त्याबाबत स्पष्टीकरण देता आले नाही. चर्चेनंतर तरुण अभियंत्यांना पुन्हा कामावर घेण्याचे कुलसचिव विठ्ठल शिर्के यांनी जाहीर केले.

विद्यापीठाकडून भूमिपुत्र ठेकेदारांनाही डावलले जाते. ज्यांच्याकडे परवाने नाहीत, जीएसटी क्रमांक नाही त्यांना कामे दिली जातात, अशा स्वरूपाच्याही तक्रारी करण्यात आल्या. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना विद्युत व स्थापत्य कामे दिली जात नाहीत, याकडेही लक्ष वेधण्यात आले. त्याबद्दल विद्यापीठ अभियंता मिलिंद डोके यांना जाब विचारण्यात आला.

मर्जीतील व नातेवाईक असलेल्या कंत्राटी अभियंत्यांच्या नेमणूक करून कामे केली जातात, विद्यापीठ उभारणीत शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्यांच्यावरही अन्याय केला जातो. विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडूनही प्रकल्पग्रस्तांना आडमुठेपणाची वागणूक दिली जाते, अशाही स्वरूपाच्या तक्रारी करण्यात आल्या. यासंदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला जाईल, असे आमदार तनपुरे यांनी सांगितले.

कुलसचिव विठ्ठल शेळके यांनी चर्चा करून समाधानकारक तोडगा काढण्याचे तसेच प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. नियंत्रक सदाशिव पाटील, विभाग प्रमुख महानंद माने व आनंद सोळुंके आदी उपस्थित होते.

शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कं. लि.
shubham
कॉर्पोरेट कार्यालयः 425, उद्योग विहार फेज IV, गुरुग्राम-122015 (हरयाणा)
फो. : 0124-4212530 / 31 / 32, ई-मेल : customercare@shubham.co वेबसाईट : www.shubham.co

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे 'अधिनियम' असा उल्लेख करण्यात येईल) मधील अनुच्छेद 13 (2) अंतर्गत सूचना

याद्वारे आपल्या निर्दशनास आणून देण्यात येते की शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कं. लि., नोंदणीकृत कार्यालय, 608-609, सहावा मजला, ब्लॉक-सी अन्सल इम्पीरियल टॉवर, कम्युनिटी सेंटर, नरैना विहार, नवी दिल्ली-110028 (यापुढे एसएचडीएफसीएल असा उल्लेख करण्यात येईल) या सुरक्षित धनकोने आपले खाते एनपीए म्हणून घोषित केले असून आपण एसएचडीएफसी यांना आपल्याकडील एकूण थकबाकी देणे लागता. तसेच आपण वरील रकमेवरील करारातील दराने पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. सुद्धा देणे लागता. त्यामुळे, याद्वारे आम्ही आपणांस सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत एसएचडीएफसीएल यांचेकडे आपल्याकडून घेणे असलेल्या संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचे आवाहन करीत असून तसे न केल्यास एसएचडीएफसी यांना सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 (4) अंतर्गत प्राप्त हक्कांचा वापर करण्याचा अधिकार असेल. कर्जदार व अनामत मत्तांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत :

अ. क्र.	कर्ज क्र. / कर्जदाराचे नाव	अर्जदाराचा पत्ता	मागणी सूचनेची तारीख व रक्कम	सुरक्षित मालमत्ता
1	Loan No.0AMN1706000005006603 ज्ञानेश्वर नारायण येवले, सुरेखा ज्ञानेश्वर येवले	फ्लॅट क्र. 13, शिवमल्हार कॉम्प्लेक्स, चेतना कॉलनी, नवनागापूर, अहमद नगर, महाराष्ट्र, 414001	22-11-2023 & Rs. 10,45,242/-	एस क्र. 47/1ए 2 प्लॉट क्र.10 ते 14/5, प्लॉट क्र.10 ते 14/5 मल्हार रे हाऊस, डुप्लेक्स आणि ट्विन बंगला योजना, नवनागापूर, ता. अहमदनगर महाराष्ट्र - 414002

स्थान : गुरगाव
दिनांक : 29-11-2023
प्राधिकृत अधिकारी
शुभम हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कंपनी लिमिटेड

मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड
MOTILAL OSWAL HOME LOANS
नोंदणी कार्यालय : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एस.टी. डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५ दूर : (०२२) ४७१८९९९९
वेबसाईट :www.motilaloswalhf.com ई-मेल : hfquery@motilaloswal.com

कब्जा सूचना (स्थावर मिळकत/तींकरिता)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. असे ज्ञात) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खालील नमूद तारखेस मागणी सूचना जारी करून पुढील कर्जदारांना सूचनेत नमूद रकमेची परतफेड सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यात पुढील कर्जदारांनी कसूर केली आहे, याद्वारे पुढील कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्न स्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टचे कलम १३ चे उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून वरील वर्णन केलेल्या मिळकतींचा कब्जा येथे खालील नमूद केलेल्या तारखांना घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र./कर्जदार/ सह-कर्जदार/हमीदार यांचे नाव	मागणी सूचनाची तारीख आणि थकबाकी	कब्जा घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्ताचे वर्णन
१	LXSHR00318-190070777 सुहास बाळासाहेब वेताळ आणि शोभा बाळासाहेब वेताळ	१०-०८-२०२३ रोजीस रु. १०१५१७८/-	२४-११-२०२३	गट नं. ३२६/१/ए/१७, मिळकत क्र. ५६६, भेंडा बुद्रुख, ता. नेवासा, जि. अहमदनगर, महाराष्ट्र ४१४६०५

विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार केल्यास **मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड** कडून येथे वरील नमूद करण्यात आलेल्या रकमेसह आणि त्यावर व्याज आकारले जाईल.

तारण मत्तांचे विमोचन करण्याकरिता उपलब्ध वेळेनुसार ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : ३०.११.२०२३
सही/-
अधिकृत अधिकारी
(मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड)
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

adani Housing Finance
अदानी हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयः शिखर, मिठाखाली सर्कलजवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद 380009, गुजरात, भारत
कॉर्पोरेट कार्यालयः वन बीकेसी, सी-विंग, 1004/5, दहावा मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051, महाराष्ट्र, भारत.
CIN: U65999GJ2017PTC098960, वेबसाईटः www.adanihousing.in

ई-लिलाव नि विक्रीसाठी जाहीर सूचना

अदानी हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांनी पुढील कर्ज खात्यांमधील कर्जदारांकडून घेणे असलेल्या कर्जाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्याच्या अधिकारांसह खाली नमूद करण्यात आलेल्या अनामत मत्तेचा ताबा घेतलेला आहे. विक्री ही **https://adanihousing.procure247.com/** या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल. तपशील याप्रमाणे आहेः

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कर्ज खाते क्र.	अचल मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना दिनांक / थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	आरक्षित किंमत / बयाणा रक्कम / बोली वृद्धी रक्कम
1	**दिवंगत श्री रवींद्र ज्ञानदेव लबडे, द्वारे त्यांचे कायदेशीर वारस आणि सह-कर्जदार श्रीमती शीतल रवींद्र लबडे (मयत यांच्या पत्नी)/शीतल रवींद्र लबडे/ 8010HL001092345**	प्लॉट क्र. 34/3 चा 49.00 चौ.मी., तळ मजल्याचे बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 35.88 चौ.मी., सर्वे क्र. 74/2ए, बोल्हेगाव आणि अहमदनगरमहानगर पालिकेच्या हद्दीत, अहमदनगर. चतुःसीमाः पूर्वेस- 9 मी. रुंद रस्ता, पश्चिमेस- प्लॉट क्र. 35, उत्तरेस- प्लॉट क्र. 34/4, दक्षिणेस- प्लॉट क्र. 34/2.	28-एप्रिल-23 / 27-एप्रिल-23 रोजी रु. 14,55,781/-	रु. 1360000/- / रु. 136000/- / रु. 1000/-

बयाणा रक्कम सादर करण्यासाठी खात्याचे तपशील (आ.कि.च्या 10%) एनईएफटी/ आरटीजीएस	खाते क्र.: ADANIH100EMDAHF001, बँकेचे नावः आयसीआयसीआय बँक लाभार्थ्याचे नावः अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा.लि., आयएफएससी कोडः ICIC0000106
ई-लिलावाचा दिनांक / वेळ-	30-डिसें-22, स. 11.00 ते दु. 4.00 वाजेपर्यंत

अटी व शर्तीः
लिलाव हा ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर राबविण्यात येत आहे.
1. **स्थळावर दि. 18-डिसें-23 आणि 22-डिसें-23 रोजी स. 11.00 ते दु. 4.30 वाजेपर्यंत पाहणी करता येईल.**
2. **ऑनलाईन बोली (बयाणा रक्कम) / प्रस्ताव दि. 30-नोव्हें-23 रोजी सुरु होईल आणि 29-डिसें-23 रोजी संपेल.**
3. प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याआगोदर मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे/ अधिकार / थकबाकी इ. बाबत आणि लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. ई-लिलाव सूचना हे बँकेचे प्रतिनिधित्व किंवा वचन नसून ती तशी समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची एएचएफपीएल यांना ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसरया पक्षाने काही दावा/ अधिकाराची / थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
4. बोली सादर करण्याअगोदर मत्तेची पाहणी करण्याची आणि विनिर्देशांबाबत स्वतःचे समाधान करून घेण्याची जबाबदारी बोलीदारांची असेल. प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद करण्यात आलेल्या स्थळी इच्छुक बोलीदारांना लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी करता येईल.
5. इच्छुक बोलीदारांनी लॉग इन आयडी व पासवर्ड च्या माध्यमातून **https://adanihousing.procure247.com/** या वेब पोर्टलच्या माध्यमातून आपली बयाणा रक्कम सादर करावी **(https://adanihousing.procure247.com/** येथे नाव नोंदवून युजर आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करता येईल). बयाणा रक्कम वर नमूद खात्यामध्ये एनईएफटी च्या माध्यमातून जमा करावी.
6. बोलीदाराने वेब पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर (एकदाच), इच्छुक बोलीदार / खरेदीदाराने बोली दस्तावेज सादर करावयाच्या शेवटच्या दिनांक व वेळेअगोदर वेब पोर्टलमध्ये पुढील कागदपत्रांच्या प्रती अपलोड करणे आवश्यक आहेः i) एनईएफटी / आरटीजीएस चलन किंवा डिमांड ड्राफ्टची प्रत; ii) पॅन कार्डची प्रत; iii) मतदार ओळखपत्र / चालक परवाना / पासपोर्ट इ. ची स्वाक्षांकित प्रत इ. सारखा ओळख / पत्याचा पुरावा (केवायसी); अन्यथा बोली फेटाळण्यात येऊ शकते. जोडपत्र-II व III **(https://adanihousing.procure247.com/** या वेब पोर्टलवरून डाऊनलोड करता येईल) नीट भरून त्यावर स्वाक्षरी करून मग ते स्कॅन करून अपलोड करणेसुद्धा आवश्यक आहे. ज्या इच्छुक बोलीदारांना लॉग इन आयडी व पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली दस्तावेज सादर करणे बाबत मदत, ऑनलाईन आपसांत बोली बाबत प्रशिक्षण / प्रात्यक्षिक हवे असल्यास त्यांनी मे. आय-सोर्सिंग टेक्नोलॉजीज प्रा.लि., 603, सहावा मजला, शिखर कॉम्प्लेक्स, नवरंगपुरा, अहमदाबाद 380 009, गुजरात, भारत;ई-मेल आयडीः **Karan@procure247.com,Rajesh@procure247.com,Tapan@procure247.com,** मदत हेल्पलाईन क्रमांकः **राजेश चौहान- 6354910183, करण मोदी - 7016716557** येथे संपर्क साधावा. चौकशीः **Helpdesk@procure247.com,** आणि विक्रीबाबत चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी **श्री ऋषिकेश देशमुख- 9372747352- ईमेल आयडीः Hrishikesh.Deshmukh@adani.com** यांचेशी सोमवार ते शनिवार कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.
7. इच्छुक बोलीदारांना **दि. 29-डिसें-23 रोजी सायं 5.30 पर्यंत** आपापले बोली दस्तावेज [बयाणा रक्कम (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी) आणि आवश्यक कागदपत्रे (मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद)] सादर करावे लागतील आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर (एकदाच) आणि स्वतः युजर आयडी व पासवर्ड जनरेट केल्यानंतर ते ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र असतील, परंतु यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याने (कागदपत्रांची) पडताळणी करणे आणि / किंवा मंजुरी देणे आवश्यक आहे.
8. ऑनलाइन आपसांत बोलीदरम्यान बोलीदार आपल्या बोली रकमेत 'बोली वृद्धी रक्कम' (वर नमूद) किंवा तिच्या पटीत वाढ करू शकतात आणि बोली ही ई-लिलाव संपण्याच्या वेळेच्या शेवटच्या 5 मिनिटांमध्ये सादर करण्यात आल्यास बंद होण्याची वेळ आपोआप 5 मिनिटांनी वाढेल (ई-लिलाव प्रक्रिया समाप्त होईपर्यंत प्रत्येक वेळी), अन्यथा तो आपोआप समाप्त होईल. ई-लिलाव प्रक्रिया समाप्त होतेवेळी सर्वोच्च बोली रक्कम (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी) सादर करणारया बोलीदारास प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर यशस्वी बोलीदार घोषित करतील.
9. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम विक्रीच्या रकमेपैकी काही भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही. यशस्वी बोलीदारास प्राधिकृत अधिकारयाद्वारे बोली किंमत स्वीकारण्यात आल्याच्या 24 तासांच्या आत तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढ्या रकमेचा भरणा करावा लागेल आणि विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रकमेचा भरणा विक्रीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत किंवा प्राधिकृत अधिकारी लेखी मंजूर करतील त्या वाढीव कालावधीत करावा लागेल. यशस्वी बोलीदाराने अशा प्रकारे भरणा न केल्यास त्याने तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्ता पुन्हा लिलावात काढण्यात येईल आणि कसूर करणारया कर्जदाराचा सदर मालमत्तेवर / रकमेवर कोणताही दावा / अधिकार असणार नाही.
10. संभाव्य अर्हताधारक बोलीदार ई-लिलावाच्या दिनांकाअगोदर मे. आय-सोर्सिंग टेक्नोलॉजीज प्रा.लि. यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. इंटरनेट नेटवर्कशी संबंधित कोणत्याही अडचणीसाठी प्राधिकृत अधिकारी/बँक किंवा मे. आय-सोर्सिंग टेक्नोलॉजीज प्रा.लि. जबाबदार नसतील आणि इच्छुक बोलीदारांनी आपण ई-लिलाव प्रक्रियेत सहभागासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याची खातरजमा करावी.
11. लागू मुद्रांक शुल्क/अतिरिक्त मुद्रांक शुल्क/हस्तांतरण शुल्के, फी तसेच कुणासही देणे असलेली वैधानिक/बिगर-वैधानिक देणी, कर, दर, मूल्यांकन शुल्के, फी. इ. चा खर्च खरेदीदारास करावा लागेल.
12. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च बोली स्वीकारण्यास बाध्य नसून कुठलेही कारण न देता कोणताही किंवा सर्वच प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा किंवा ई-लिलाव बरखास्त करण्याचा/पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा अधिकारसुद्धा त्यांना असेल.
13. बोलीदारांनी आपल्या बोली सादर करण्याअगोदर आणि ई-लिलावात सहभागी होण्याअगोदर मे. आय-सोर्सिंग टेक्नोलॉजीज प्रा.लि. च्या **https://adanihousing247.com/** या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या ई-लिलावाच्या अटी व शर्तींचा तपशील वाचवा.
14. सदर प्रकाशन अनिवार्य प्रभाव कलमाच्या अधीन आहे.

विशेष सूचना
बोलीदारांनी स्वतःचे हित लक्षात घेत शेवटच्या क्षणी बोली देण्याचे टाळावे कारण यात काही (इंटरनेट खंडित होणे / वीजपुरवठा खंडित होणे इ.) सारख्या समस्या उद्भवल्यास त्यासाठी अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा.लि. किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशा अप्रिय स्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी पावर सप्लाय बॅक-अप इ. सारख्या सर्व आवश्यक त्या तरतुदी / पर्यायी व्यवस्था करून ठेवाव्यात म्हणजे त्यांना अशा परिस्थितींना बगल देत लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल.

टीप- सर्फेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 30 दिवसांची वैधानिक विक्री सूचना
याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद रकमेचा अद्ययावत व्याज आणि आनुषंगिक खर्चासह ई-लिलावाच्या दिनांकाअगोदर भरणा करावा, अन्यथा मालमत्तेचा लिलाव/ विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कांसह वसूल करण्यात येईल.

स्थानः महाराष्ट्र
दिनांकः 30.11.2023
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
स्वा/- प्राधिकृत अधिकारी
अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा.लि.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज शनिशिंगणापूरमध्ये

लोकसत्ता प्रतिनिधी

नगर : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या, गुरुवारी शनिशिंगणापूर येथे शनिदेवाच्या दर्शनासाठी येत आहेत. काही वर्षांपूर्वी शनिशिंगणापूरच्या चौथऱ्यावर जाऊन महिला भाविकांना शनिदेवाच्या दर्शनास परवानगी मिळावी, यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींची भेट लक्षणीय मानली जाते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तीन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर आहेत.

पुणे येथून त्यांचे हेलिकॉप्टरने झापवाडी (ता. नेवासा) येथे सकाळी ११ वा. आगमन होईल. त्यांच्या समवेत राज्यपाल रमेश बैस असतील. महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे राष्ट्रपतींचे स्वागत करतील. शनी मंदिरात राष्ट्रपती दुपारी दोनपर्यंत असतील. त्यानंतर त्या हेलिकॉप्टरने पुण्याकडे रवाना होतील, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे नगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील वाहतूक वळवण्यात आली आहे. राष्ट्रपतींचा वाहनताफा झापवाडी येथून घोडेगावमार्गे शनी शिंगणापूर येथे नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून जाणार आहे. त्यामुळे नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक शेंडी बाह्यवळण रस्ता ते नेवासे दरम्यान वळवण्यात आली आहे.

नगरकडून घोडेगावमार्गे नेवासेकडे जाणारी वाहतूक शेंडी बाह्यवळण-विळद बाह्यवळण-राहुरी-देवळाली प्रवरा -बेलापूर-श्रीरामपूर-टाकळीभान मार्गे नेवासा, तसेच नेवासाकडून घोडेगावमार्गे नगरकडे येणारी वाहतूक नेवासा-टाकळीभान-श्रीरामपूर-बेलापूर-देवळाली प्रवरा-राहुरी-विळद बाह्यवळणमार्गे नगर अशी वळवण्यात आली आहे; तसेच शेंडी बाह्यवळण ते नेवासा रस्ता यादरम्यान जड वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला आहे.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

जागासंबंधी

मालमत्ताविषयक

महाराष्ट्रा डेव्हलपर्स- शेतजमीन खरेदी करण्यासाठी मिळवा कायदेशीर शेतकरी दाखला फक्त २० दिवसात. घरपोच सेवा. १००% खात्री. संपर्क: 8087064064/ 8087065065.
0070865560-1

यात्रा विशेष

यात्रासहल

दोस्ती टूर * शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमा * नेपाळ * पुरी- गंगासागर- सुंदरबन * भूतान * श्रीदत्त परिक्रमा * दिल्ली- आग्रा- कुरूक्षेत्र- मथुरा * मध्य प्रदेश * कुरवपूर- पिठापूर * काश्मीर- ट्युलिपसह. 9594880123/ 8828224121.
0070839968-18

''हिमसेतू टूर्स''- 7021799043/ 7021799044. * तुमच्या सगळ्यांच्या सहकार्याने जानेवारी नर्मदा परिक्रमा फुल, फेब्रुवारीचे बुकिंग सुरू.* आसाम- अरुणाचल- मेघालय- २५ मार्च.
0070828840-11

स्थावर मालमत्ता? तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

visit us at WWW.LOKSATTA.COM